# मराठी
# सुलभभारती
## इयत्ता चौथी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.


(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.


(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.


CMYK

- **कोडी सोडवा.**




- **वाचा.**




CMYK

शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/७४९८/मंजुरी/ड-५०५/२७५१ दिनांक : १७/५/२०१४



# मराठी

# सुलभभारती

## इयत्ता चौथी

### अमराठी माध्यमांच्या शाळांसाठी

(हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी, इ.)



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**



973B5C

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१४
सातवे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**
प्रा. रा. रं. बोराडे, अध्यक्ष
इरगोंडा पाटील, सदस्य
फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सदस्य
वाहरू सोनवणे, सदस्य
प्रा. प्रज्ञा दया पवार, सदस्य
डॉ. सुभाष सावरकर, सदस्य
किशोर दरक, सदस्य
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
(सदस्य-सचिव)

**मराठी भाषा समिती - कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्‌माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**संयोजन :** श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
प्र. विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार :** खलील खान, आफताब खान

**मुखपृष्ठ :** राजेंद्र गिरधारी

**अक्षरजुळणी :** भाषा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :** सच्चिदानंद आफळे
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर
निर्मिती अधिकारी

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रिमव्होव

**मुद्रणादेश:**N/PB/2021-22/QTY.

**मुद्रक :**M/s.

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय सन २००९ मध्ये घेतला. 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२' मध्येही याच धोरणानुसार, इयत्ता पहिलीपासून अमराठी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता चौथीचे 'मराठी सुलभभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

विद्यार्थ्यांनी इयत्ता तिसरीपर्यंत श्रवण, भाषण-संभाषण, वाचन ही भाषिक कौशल्ये आत्मसात केली आहेत. आता इयत्ता चौथीमध्ये या कौशल्यांबरोबर लेखन कौशल्यावर भर दिला आहे. ही भाषिक कौशल्ये विकसित होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अनुभव व भावविश्वातील पाठ, गाणी, कविता, चित्रकथा, चित्रवर्णन, अनुभवकथन, अनुभवतक्ते पाठ्यपुस्तकात दिले आहेत. पाहुणा ओळखा, आकारभेद यांसारखे कृतियुक्त भाषिक खेळ, मनोरंजनासाठी विनोद व मुलांनी कल्पकतेने काढलेली चित्रे दिली आहेत.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी समिती आणि संबंधित समीक्षक, तज्ज्ञ, चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १७ मे २०१४
२७ वैशाख, शके १९३६

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## इयत्ता चौथी– मराठी सुलभभारती अध्ययन निष्पत्ती

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- |
| **सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**<br>• विविध विषय, परिस्थिती, घटना, अनुभव, कथा, कविता इत्यादी स्वत:च्या पद्‌धतीने मराठी भाषेत सांगण्याची/प्रश्न विचारण्याची तसेच त्यात भर घालण्याची संधी दिली जावी.<br>• वाचनकट्टा/ग्रंथालयात मुलांना स्तरानुसार वेगवेगळ्या प्रकारचे मनोरंजक साहित्य उदा. बालसाहित्य, बालपत्रिका, फलक, दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध करून द्यावे.<br>• वेगवेगळ्या कथा, कविता, फलक इत्यादी वाचून समजणे-समजावणे, त्यावर आपली प्रतिक्रिया देणे, चर्चा करणे, प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.<br>• विविध उद्‌देशांना लक्षात घेऊन अध्ययनाच्या विविध आयामांना इयत्तांमध्ये योग्य स्थान देण्याची संधी असावी. उदा. एखाद्या घटना किंवा पात्रासंबंधी आपली प्रतिक्रिया, मत, तर्क मांडणे, विश्लेषण करणे इत्यादी.<br>• कथा, कविता इत्यादींचे प्रकट वाचन करणे-ऐकणे आणि ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या गोष्टी मराठी भाषेत सांगणे (भाषिक आणि सांकेतिक स्वरूपात) या संधी आणि त्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>• आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार मराठी भाषा समजून घेण्याची (नवीन शब्द/वाक्य इत्यादी) आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• एकमेकांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकणे, पुस्तकातील गोष्टी वाचणे आणि त्यावर आपले मत देणे, त्यात आपल्या विचारांची भर घालून विविध प्रकारे सांगण्याची संधी दिली जावी.<br>• आपल्या पद्‌धतीने/सर्जनशीलतेने अभिव्यक्त (तोंडी आणि सांकेतिक स्वरूपात) होण्यासाठीचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• आजूबाजूला घडणाऱ्या क्रिया/घटना (उदा. माझ्या घराच्या छतावरून सूर्य का दिसत नाही ? समोरील झाडावर बसलेली चिमणी कोठे निघून गेली, यांसारखे प्रश्न विचारणे, सहअध्यायींशी चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• वर्गात आपल्या मित्रांच्या बोलींचे निरीक्षण करण्याची संधी दिली जावी. उदा. आंबा, पोळी, पोपट अशा शब्दांना आपापल्या भाषेत काय म्हटले जाते, हे जाणून घेण्याची संधी दिली जावी.<br>• आशयाच्या संदर्भाने वापरल्या जाणाऱ्या भाषेचे बारकावे समजून घेण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादी (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला इत्यादी) यांमध्ये येणारे शब्द समजणे आणि त्यांचा संदर्भानुसार वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• पाठ्यपुस्तक आणि त्याच्याशी संबंधित इतर साहित्यांत आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आणि इतर संवेदनशील मुद्द्यांना समजून घेऊन त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी. | **अध्ययनार्थी –**<br>04.16.01 इतरांकडून सांगितली जाणारी गोष्ट लक्षपूर्वक ऐकून त्यावर आपले मत व्यक्त करतात व प्रश्न विचारतात.<br>04.16.02 ऐकलेल्या साहित्य प्रकारांतील विषय, घटना, चित्र, पात्र, शीर्षक यांविषयी चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत व्यक्त करतात.<br>04.16.03 कथा, कविता किंवा इतर साहित्याविषयी सांगताना त्यांत आपल्या स्वत:च्या विचारांची भर घालतात.<br>04.16.04 स्वत:चे म्हणणे मांडताना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात.<br>04.16.05 विविध प्रकारचे साहित्य (उदा. वर्तमानपत्रांतील बातम्यांचे शीर्षक, बालसाहित्य) यांमध्ये आलेल्या नैसर्गिक, सामाजिक तसेच इतर बाबी संवेदनशीलतेने समजून घेऊन त्यांवर चर्चा करतात.<br>04.16.06 वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी स्वरूपात व्यक्त करतात.<br>04.16.07 पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रांतील ठळक शीर्षक, प्रसिद्‌धीफलक इत्यादी) यांचे समजपूर्वक वाचन करतात.<br>04.16.08 वेगवेगळ्या साहित्यरचनेत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ संदर्भाने समजून घेतात.<br>04.16.09 वाचायला उत्सुक असतात आणि वाचनकोपरा/ग्रंथालयातून आपल्या आवडीची पुस्तके निवडतात व त्यांचे वाचन करतात.<br>04.16.10 वाचलेल्या रचनांमधील मुख्य विषय, घटना, चित्र, पात्र, शीर्षक यासंबंधी चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत व्यक्त करतात.<br>04.16.11 स्तरांनुसार इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अभ्यास, नृत्यकला) वापरला जाणारा शब्दसंग्रह समजून घेतात.<br>04.16.12 भाषेतील विविध बारकावे उदा. शब्दांची पुनरावृत्ती, लिंग, वचन इत्यादींविषयी सजग राहून कथन करतात.<br>04.16.13 एखाद्या विषयावर बोलताना शब्दांचे बारकावे, त्यांतील अंतर समजून घेतात व बोलताना शब्दांचा योग्य वापर करतात.<br>04.16.14 स्वत:च्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया समजून घेतात, स्वत:चे लेखन तपासून घेतात, लेखनाची उद्दिष्टे आणि वाचक यांनुसार त्यात बदल करतात.<br>04.16.15 वेगवेगळ्या साहित्यांमध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा आपल्या कथनात वापर करतात.<br>04.16.16 विविध उद्देशांसाठी लेखन करताना योग्य विरामचिन्हाचा (उदा. पूर्णविराम) जाणीवपूर्वक वापर करतात.<br>04.16.17 आपल्या कल्पकतेनुसार गोष्ट, कविता, वर्णन इत्यादी कथन करताना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृ.क्र. | अ.क्र. | पाठाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | झाड (गाणे) - ज्ञानदा आसोलकर | १ | १७. | पाहा, पण... | २० |
| २. | मैत्री (चित्रकथा) | २ | १८. | माझा अनुभव - १ | २१ |
| ३. | मुलांनी काढलेली चित्रे-१ | ३ | १९. | आगगाडी (कविता) - शंकर विटणकर | २३ |
| ४. | चित्रवर्णन | ४ | २०. | मुलांनी काढलेली चित्रे-२ | २५ |
| ५. | गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या (कविता) | ५ | २१. | बसस्थानक | २६ |
| ६. | फरक ओळखा | ६ | २२. | स्वच्छ घर - स्वच्छ परिसर | २७ |
| ७. | अक्षरजाळे | ७ | २३. | माझा अनुभव - २ | २८ |
| ८. | गंमतकोडे | ८ | २४. | ईद | ३० |
| ९. | वाचूया, गिरवूया | ९ | २५. | संगणक (कविता)- बबन शिंदे | ३३ |
| १०. | ओळखा पाहू ! | १० | २६. | आमचे चुकले | ३५ |
| ११. | शब्दपट वाचूया | ११ | २७. | धाडसी झुगी | ३७ |
| १२. | शब्दांशी खेळूया | १२ | २८. | प्रश्न (कविता) - प्रभा मुळे | ३९ |
| १३. | ओळखूया, सांगूया | १३ | २९. | मी सगळ्या भाज्या खाणार ! | ४१ |
| १४. | खेळातील स्वयंपाक (कविता) - किशोर पाठक | १४ | ३०. | खुर्ची आणि स्टूल (कविता) - विंदा करंदीकर | ४४ |
| १५. | झाड आपला मित्र | १६ | ३१. | आपलं वाचनालय | ४५ |
| १६. | चतुर कासव (शब्द-चित्रकथा) | १८ | | | |

# १. झाड

- **ऐका व म्हणा.**

चिंगीनं लावलं एक झाड,
झाडाला म्हणाली, लवकर वाढ.

तुला रोज घालीन पाणी,
तुझ्यासाठी गाईन गाणी.

गाणी ऐकून फुलं फुलतील,
फुलपाखरांचे थवे झुलतील.

फुलतील फुलं छान छान,
हसत राहील पानन्‌पान.

**– ज्ञानदा आसोलकर**






**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. गाण्याची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणायला सांगावे. नंतर स्वत:बरोबर, वर्गाबरोबर, गटात तसेच वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात, साभिनय म्हणण्यास सांगावे. चित्राचे वर्णन करण्यास सांगावे.

# २. मैत्री

- **पाहा व बोला.**



- **चित्रे पाहा. सांगा.**

(अ) मुलगा कोठे उभा आहे ?

(आ) मुलगा कोणाला घाबरला ?

(इ) मुलगा झाडावर का चढला ?

(ई) मुलाने हत्तीच्या सोंडेत फळ का दिले ?

(उ) हत्तीला आनंद का झाला ?

(ऊ) गोष्टीतील मुलाच्या जागी तुम्ही असता तर तुम्ही काय केले असते ?

(ए) तुम्हांला माहीत असलेली मुलांच्या चातुर्याची एखादी गोष्ट सांगा.

97L38H

**शिक्षकांसाठी :** प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे. विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्रासंबंधी प्रश्न विचारण्यास सांगावे. पुढे काय घडले असेल ते विचारावे. विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द, वाक्ये फळ्यावर लिहावी. वाचून दाखववी. त्या वाक्यांची मदत घेऊन गोष्ट सांगावी. रिकाम्या चौकटीत चित्र काढण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना गोष्ट सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ३. मुलांनी काढलेली चित्रे-१

- पाहा व बोला.
- चित्रावरून गोष्ट सांगा.




- चित्रावरून तुम्हांला काय समजले ते सांगा.




**शिक्षकांसाठी :** १. ही चित्रे त्यांच्याच वयाच्या मुलांनी काढली आहेत, हे विद्यार्थ्यांना सांगावे. त्यांना पहिल्या चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रावर प्रश्न विचारावे. या चित्रातील प्रसंगाच्या आधी काय काय घडले असेल ते विचारावे. चित्रावरून पूर्ण गोष्ट सांगण्यास सांगावे. २. दुसऱ्या चित्रात काय दिसते ते विचारावे. 'तुमच्या घरी पाण्याचा वापर जपून केला जातो का? पाणी वाया जाऊ नये म्हणून तुम्ही काय काय कराल ?' यांसारखे प्रश्न विचारून दुसऱ्या चित्राशी संबंधित चर्चा करावी.

# ४. चित्रवर्णन

984UBX

• पाहा व सांगा.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून चित्राचे निरीक्षण करून घ्यावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. चित्राचे वर्णन करण्यास सांगावे. पावसाळ्यातील त्यांचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ५. गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या

- **ऐका व म्हणा.**



टप्‌टप्‌ टप्‌टप्‌ पडती गारा,
पटपट पटपट वेचू साऱ्या.
पकडुनि धरता वितळुनि गेल्या,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.

गड्‌गड्‌ गड्‌गड्‌ मेघ गरजती,
चमचम चमचम विजा चमकती.
थुईथुई थुईथुई मोर नाचती,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.

थडथड थडथड थंडी वाजते,
हाक आईची ऐकू येते.
घरात जाऊनि स्वच्छ होऊया,
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या.

**शब्दार्थ :** **मेघ –** ढग. **गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या –** पावसात भिजत गोलगोल फिरण्याचा मुलांचा खेळ.

**प्र. १. उत्तरे सांगा.**

(अ) कविता कशाबद्दल आहे ?
(आ) ही कविता कोण म्हणत असेल ?
(इ) विजा चमकतात तेव्हा तुम्हांला काय वाटते ?

9BDQ0K

**प्र. २. कोण ते सांगा.**

(अ) टप्‌टप्‌ पडणाऱ्या. (आ) गडगड गरजणारे. (इ) चमचम चमकणारी.
(ई) थुईथुई नाचणारा. (उ) थडथड वाजणारी.

**प्र. ३. शेवटची अक्षरे जुळणारे कवितेतील शब्द सांगा.**

**प्र. ४. टप्‌टप, गड्‌गड्‌ यांसारखे नादमय शब्द या कवितेत आले आहेत. असे आणखी शब्द सांगा.**

**तोंडी काम –** गारा हातात घेतल्यानंतर वितळून का जातात, याविषयी चर्चा करा.

**अभिनय करा –** गारा वेचणे, थडथड थंडी वाजणे, भिंगोऱ्या खेळणे.

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. कवितेची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना स्वतःबरोबर कविता म्हणण्यास सांगावे. वर्गाबरोबर, गटात व वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.


# ६. फरक ओळखा

- दोन चित्रांतील फरक ओळखा.





- गटात न बसणारी आकृती ओळखा. त्यावर ✓ अशी खूण करा.



- पाहा. आकारात कसा फरक पडत गेला ते सांगा.



 ग म भ

ट ड इ ई


 प फ

- आकारानुसार गटात न बसणारे अक्षर ओळखा. त्या अक्षराखाली रेघ ओढा.

| | | | |
|---|---|---|---|
| प | ष | फ | ल |
| क | र | ब | व |
| र | श | ज | स |
| ट | ठ | ढ | ण |
| म | भ | न | ई |

# ७. अक्षरजाळे

- ‘अ’ पासून सुरुवात करा. अक्षरे वाचत वाचत जाळ्यातून बाहेर पडा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना जाळ्यातील अक्षरे गटागटांत वाचण्यास सांगावे. कोणत्याही अक्षरापासून सुरुवात करून उलट-सुलट क्रमाने अक्षरे वाचून घ्यावी. विचारलेले अक्षर दाखवण्याचा खेळ घ्यावा.

# ८. गंमतकोडे

- अ, आ, ओ, औ, अं या अक्षरांपासून तयार होणाऱ्या शब्दांची चित्रे शोधा. दाखवा व नावे सांगा.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी सांगितलेली नावे फळ्यावर लिहावी. वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. नामपट्ट्या तयार कराव्या. त्या त्या वस्तूशेजारी ठेवण्यास सांगाव्या. अ, आ, ओ, औ, अं या अक्षरांपासून सुरुवात होणारे आणखी शब्द विद्यार्थ्यांना विचारावे.

# ९. वाचूया, गिरवूया


- खालील चित्रे पाहा. नावे वाचा व गिरवा.


पेन


वही


फळा


रिक्षा



कैरी


रुपया


पेरू


अंगठी


पोलीस


चौक


ऊस


पपई


एक


लसूण


तबला


झोका


**शिक्षकांसाठी :** अक्षरे योग्य दिशेने कशी गिरवायची याचे प्रात्यक्षिक दाखवावे. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून वरील शब्द लिहून घ्यावे. वाचून घ्यावे. आणखी वेगळ्या शब्दांचा सराव घ्यावा.

# १०. ओळखा पाहू !

• चित्रे पाहा. नावे सांगा. नावे पूर्ण करा व वाचा.



इ...रत



मा...




...म...




गु...ब




प...ग



...द



...माल



...ल



...डा



...त्रा



...ल





...ळी

**शिक्षकांसाठी :** प्रत्येक चित्राचे नाव विचारावे. नाव फळ्यावर लिहावे. ते नाव पाहून नावातील गाळलेली अक्षरे विद्यार्थ्यांना लिहायला सांगावी. सर्व नावे पूर्ण केल्यानंतर वाचून घ्यावी. यापेक्षा वेगळी चित्रे जमा करावी. त्यांच्या नामपट्ट्या तयार कराव्या. नामपट्ट्या व चित्रे यांच्या जोड्या गटागटांत जुळवण्यास सांगाव्या. नामपट्ट्यांवरील शब्द वाचून घ्यावे. लिहून घ्यावे.

# ११. शब्दपट वाचूया

- **वाचा.**

| | | | |
|---|---|---|---|
| हौद  | हौद पाण्याने भरला आहे. | पतंग  | आम्ही पतंग उडवतो. |
| घोडा धावतो. | घोडा  | बैल चारा खातो. | बैल  |
| फूल  | फूल छान आहे. | केळी  | केळी पिवळी आहेत. |
| लाल गुलाब पाहा. | गुलाब  | चिमणी झाडावर बसली. | चिमणी  |
| मासा  | हा मासा पाहा. | इमारत  | इमारत बघ. |

**शिक्षकांसाठी :** शब्द व वाक्ये लिहिलेला पट प्रत्येक गटात द्यावा. गटातील प्रत्येक विद्यार्थ्यास क्रमाने शब्द व वाक्य वाचण्यास सांगावे. वाचता न आलेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा उजळणी घ्यावी. आवश्यक तिथे मार्गदर्शन करावे.

# १२. शब्दांशी खेळूया

9A7H04

- **खालील शब्द वाचा. समजून घ्या व लिहा.**

उदा.,  पूर – चंद्रपूर.

(अ)  पूर

______

______

(आ) चिंच 

______

______

(इ) ४० गाव

______

______

(ई)  पूर

______

______

(उ)  गाव

______

______

(ऊ) १२ मती

______

______

(ए)  चिरोली

______

______

(ऐ) ३२ शिराळा

______

______

(ओ)  गाव

______

______

(औ)  गाव

______

______

- **खालील शब्दांना 'पूर' शब्द जोडा. गावांची नावे लिहा. वाचा.**

खाना·····　　सोला·······　　विजा·········　　राजा·········

- **खालील शब्दांना 'वाडी' शब्द जोडा. गावांची नावे लिहा व वाचा.**


पळस·····　　सावंत·····　　कुर्डू·····　　किर्लोस्कर·····

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांनी तयार केलेली नावे फळ्यावर लिहावी. त्यांच्याकडून वाचून घ्यावी. फळ्यांवरील नावे पाहून लिहिण्यास सांगावी. नावाच्या शेवटी पूर, नगर, वाडी हे शब्द असलेली आणखी गावांची नावे विद्यार्थ्यांना विचारावी.

# १३. ओळखूया, सांगूया

• चित्रे पाहा. ओळखा. वाक्ये सांगा. वाक्ये लिहा.









**शिक्षकांसाठी :** प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रांशी संबंधित शब्द विचारावे. ते शब्द फळ्यावर लिहावे. चित्राशी संबंधित शब्द वाचून दाखवावे. वाचून घ्यावे. त्या शब्दांचा उपयोग करून वाक्ये तयार करून घ्यावी. विद्यार्थ्यांनी सांगितलेली वाक्ये फळ्यावर लिहावी. ती वाक्ये पाहून विद्यार्थ्यांना चित्रांखाली लिहायला सांगावे.

# १४. खेळातील स्वयंपाक

• **ऐका व म्हणा.**



पिठामध्ये पाणी घालतो,
तिंबून तिंबून कणीक मळतो,
भरभर भरभर पोळी लाटतो.
पोळीचा फुगा तव्यावरती फुगतो,
गरमगरम पोळी वाढतो.

विळीवरती वांगी चिरतो,
गरम मसाला त्यात भरतो.
कढईत तेल, मोहरी फुटता,
तिखट घालून रस्सा करतो.

डाळ, तांदूळ भांड्यात भरतो,
पाण्याची वर धार धरतो.
कुकरच्या तोंडात शिट्टी कोंबतो,
स्वयंपाक झाला, जाहीर करतो.

स्वयंपाक माझा डबीत मावतो,
तरीही आम्ही पोटभर जेवतो.
पचनासाठी दोन फळे,
प्रत्येकाला देऊन ठेवतो.

**– किशोर पाठक**

• **खालील कामांसाठी कवितेत आलेल्या कृती क्रमाने सांगा.**

(अ) पोळी करणे. (आ) भाजी करणे. (इ) भात करणे.

• **खालील कृतींसाठी कोणती साधने लागतात ते सांगा.**

(अ) पोळी भाजणे. (आ) भाजी चिरणे. (इ) भात करणे.

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. कवितेची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांना स्वतःबरोबर कविता म्हणायला सांगावे. वर्गाबरोबर, गटात व वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.

- **खालील अक्षरांपासून नवीन शब्द बनवा.**

**उदा.,** चा, रा, स, द, र, घ.

**शब्द –** चारा, चार, रस, रास, दसरा, घर, दर, चादर, सरसर, सदरा.

(अ) का, पा, य, ल. (इ) क, मा, स, वी, र.

(आ) प, ना, सा, ट, क. (ई) मो, री, ह, र, णी, पा.

- **उपक्रम :**

(१) घरी आई स्वयंपाक करत असताना निरीक्षण करा. पोळी, भाजी, भात करताना कोणकोणत्या कृती केल्या जातात, कोणत्या क्रमाने केल्या जातात ते लक्षात घ्या. वर्गात सांगा.

(२) विद्यार्थ्यांकडून वर्गात भेळ तयार करून घ्यावी. त्याची कृती सांगण्यास सांगावे.


- **चित्र पाहा. वर्णन करा.**



9LV2BB

# १५. झाड आपला मित्र

- पाहा. बोला.




- चित्र पाहा. झाडाचे उपयोग सांगा.
- कोणत्याही एका झाडाचे चित्र काढा.
- झाडाने त्याच्या खोडाला फलक लावले आहेत. त्यावरील मजकूर वाचा. ते फलक का लावले आहेत ते सांगा.

**शिक्षकांसाठी :** झाडांच्या खोडांना लावलेल्या फलकांवरील मजकूर विद्यार्थ्यांना वाचून दाखवावा. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा. फलकावर लिहिलेल्या झाडांच्या उपयोगांव्यतिरिक्त आणखी कोणकोणते उपयोग आहेत, ते विद्यार्थ्यांना सांगावे.

- **ऐका. म्हणा व वाचा.**

झाडे लावा. झाडे जगवा.

झाडांमुळे सावली मिळते. झाडांमुळे गारवा मिळतो.

झाडे जमिनीची धूप थांबवतात.

झाडे हवा शुद्ध ठेवतात.

झाडांमुळे प्रदूषण कमी होते.

- **शब्दपट्ट्या वाचा. वाक्ये तयार करा व सांगा.**

झाड, झाडे, फुले, फळे, औषधी, देते, देतात.
**उदा.,** झाड फुले देते. झाडे फुले देतात.

- **वाचा. समजून घ्या.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ऑक्सिजन | क्सि | क् + स + ि | वाळलेल्या | ल्या | ल् + य + ा |
| फक्त | क्त | क् + त | फांद्या | द्या | द + ्य + ा |

- **ऐका. पाहा व म्हणा.**

उद्या, नद्या, होड्या, गोट्या, मोठ्या, फांद्या.

- **'खेळातील स्वयंपाक' या कवितेत आलेले जोडाक्षरयुक्त शब्द पाहून लिहा.**

- **वाचा.**

| एक | अनेक |
|---|---|
| झाड | झाडे |
| फांदी | फांद्या |
| पक्षी | पक्षी |

| एक | अनेक |
|---|---|
| मूल | मुले |
| घरटे | घरटी |
| जनावर | जनावरे |

| एक | अनेक |
|---|---|
| फूल | फुले |
| फळ | फळे |
| पान | पाने |

- **खालील शब्दांमध्ये लपलेले शब्द शोधा. सांगा.**

**उदा.,** जनावरे. **शब्द –** जना, नाव, जव, नारे.

१. पाऊस २. वादळामुळे

- **उपक्रम :** तुमच्या परिसरातील सर्वांत जुने झाड शोधा. झाड व त्याच्या सभोवतालच्या परिसराचे निरीक्षण करा. त्या झाडाविषयी माहिती मिळवा. वर्गात सांगा.

**शिक्षकांसाठी :** द, ट, ठ, ड, ढ यांसारख्या अक्षरांना 'य' जोडताना ही अक्षरे पूर्ण लिहावी व त्यांना ' ्य ' (पाऊण आकारात) जोडावा, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. अक्षरे कशी जोडली जातात याचे निरीक्षण करण्यास सांगावे.

# १६. चतुर कासव

• ऐका. समजून घ्या. म्हणा.


एक दिवस  जंगलाकडे निघाले. त्याला  दिसला.  त्याच्या दिशेनेच येत होता.  घाबरले.  आपली मान व पाय कवचात ओढून घेतले.  कवच पाहिले. आपल्या पायाने कवचाला ओरखडले.  वाटले, 'हा तर दगडच आहे.'  पुढे निघून गेला.  हळूच मान बाहेर काढली. ते पाण्यात शिरले.   आवाज दिला.  मागे वळून पाहिले. तो स्वत:शीच म्हणाला, 'अरेरे ! शिकार हातची गेली.'

• वाचा.

## चतुर कासव

एक दिवस **कासव** जंगलाकडे निघाले. त्याला **कोल्हा** दिसला. **कोल्हा** त्याच्या दिशेनेच येत होता. **कासव** घाबरले. **कासवाने** आपली मान व पाय कवचात ओढून घेतले. **कोल्ह्याने** कवच पाहिले. आपल्या पायाने कवचाला ओरखडले. **कोल्ह्याला** वाटले, 'हा तर दगडच आहे.' **कोल्हा** पुढे निघून गेला. **कासवाने** हळूच मान बाहेर काढली. ते पाण्यात शिरले. **कासवाने** **कोल्ह्याला** आवाज दिला. **कोल्ह्याने** मागे वळून पाहिले. तो स्वत:शीच म्हणाला, 'अरेरे ! शिकार हातची गेली.'





**शिक्षकांसाठी :** एकच गोष्ट दोन प्रकारे लिहिली आहे, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. दोन्ही गोष्टींचे निरीक्षण करण्यास सांगावे. पहिल्या गोष्टीतील चित्रांऐवजी दुसऱ्या गोष्टीत कोणते शब्द आले आहेत, हे विचारावे. सर्व चित्रांसंबंधीचे शब्द ओळखून झाल्यानंतर पहिली गोष्ट वाचून दाखवावी. एकेक वाक्य मागे म्हणण्यास सांगावे. चित्रांच्या जागी शब्द लिहिलेली गोष्ट वाचण्यास सांगावे.

- **या गोष्टीत कोल्हा, कासव हे शब्द वेगवेगळ्या प्रकारे आले आहेत. ते वाचा. आता खालील शब्दांची अशीच वेगवेगळी रूपे सांगा.**

(अ) आई (आ) झाड (इ) घोडा.

- **वाचा. समजून घ्या.**

| | | |
|---|---|---|
| कोल्हा | ल्हा | ल् + ह + ा |
| कोल्ह्याने | ल्ह्या | ल् + ह + य + ा |
| स्वतः | स्व | स् + व |
| पाण्यात | ण्या | ण् + य + ा |

- **चित्र पाहा. वर्णन करा.**



# १७. पाहा, पण...

- ऐका. म्हणा.




**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(अ) मिनू काय करत होती ?

(आ) मिनूने आईला हाक का मारली ?

(इ) टीव्ही पाहताना कोणती काळजी घ्यावी ?


9HMP09

**प्र. २. तुम्हांला टीव्हीवरील कोणते कार्यक्रम आवडतात ? ते का आवडतात ते सांगा व लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. काय दिसते ते विचारावे. गोष्टीचे प्रकट वाचन करावे. गोष्टीतील जोडाक्षरयुक्त शब्द फलकावर लिहावे. लिहिताना विद्यार्थ्यांना लेखन कसे केले जाते, याचे निरीक्षण करायला सांगावे. विद्यार्थ्यांकडून ते शब्द वाचून घ्यावे. वाचनाचा सराव द्यावा.

# १८. माझा अनुभव – १


• ऐका, पाहा व वाचा.



चंदन, माझा व सुमाचा मित्र आहे. तो आजारी पडला, म्हणून आम्ही त्याला भेटायला निघालो.




आम्ही त्याच्या घरी पोहचलो. आम्ही त्याला फळे दिली. फुले दिली.




''काळजी घे. वेळेवर औषध घे.'' सुमा म्हणाली.



''तू लवकर बरा हो. मग आपण खेळू, मजा करू.'' मी म्हणाले.



चंदन म्हणाला, ''रेहाना, सुमा तुम्हांला भेटून मला आनंद झाला. आता मला बरं वाटतंय.''



चंदनने आमचे आभार मानले. निघताना चंदनचा चेहरा हसरा दिसत होता. हे पाहून आम्हांलाही आनंद झाला.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय दिसते, ते विचारावे. अनुभव-कथनाचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे. चित्रांतील विषयाशी संबंधित अनुभव विद्यार्थ्यांना विचारावे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांवरून अनुभव-तक्ते तयार करावे. वाचून घ्यावे. वर्गात या प्रसंगाचे सादरीकरण करून घ्यावे.

## प्र. १. कोण म्हणाले, ते लिहा.

(अ) काळजी घे. वेळेवर औषध घे.

(आ) तू लवकर बरा हो.

(इ) आता मला बरं वाटतंय.

## प्र. २. सांगा.

(अ) चंदनला आनंद का झाला ?

(आ) 'मी' हा शब्द कोणासाठी आला आहे ?

(इ) 'आम्ही' हा शब्द कोणासाठी आला आहे ?

## प्र. ३. तुमचा मित्र/मैत्रीण आजारी पडला/पडली तर तुम्ही काय कराल ?

## प्र. ४. घटनाक्रमानुसार खालील वाक्यांचा क्रम लावा. वाक्यासमोर क्रमांक लिहा.

(अ) ''काळजी घे. वेळेवर औषध घे.'' सुमा म्हणाली. ( )

(आ) चंदनने दोघींचे आभार मानले. ( )


(इ) आम्ही त्याला फळे दिली. फुले दिली. ( )

(ई) आम्ही त्याच्या घरी गेलो. ( )

(उ) चंदन, माझा आणि सुमाचा मित्र आहे. ( )


(ई) तो आजारी पडला. ( )

• **पाहा. वाचा. रिकाम्या चेहऱ्यावर भाव दाखवा व लिहा.**



# १९. आगगाडी

- **ऐका व म्हणा.**



झुकझुक गाडी
घरांची माळ,
चालती फिरती
अजब चाळ !

धावत जाते
गावोगाव,
हुंदडत फिरते
गावन्‌गाव.

पाऊस, वाऱ्याची
नसे भीती,
वाटेत वादळ
असो किती !

तिला न अडवी
नदी, पहाड,
टाटा म्हणते
झाडन्‌झाड.

छंद म्हणा की
उद्योग खरा,
सर्वांना पोचवी
घरा घरा !

**– शंकर विटणकर**

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. कवितेची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना कविता म्हणण्यास सांगावे. स्वतःबरोबर विद्यार्थ्यांना कविता म्हणायला सांगावे. वर्गाबरोबर, गटात व वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.

**प्र. १. उत्तरे सांगा.**

(अ) आगगाडीला घरांची माळ का म्हटले आहे?

(आ) आगगाडी कोठे जाते?

(इ) आगगाडी कशाला भीत नाही?

(ई) आगगाडीला कोण अडवू शकत नाही?

(उ) आगगाडीला टाटा करणारे कोण?

(ऊ) सर्वांना घरी कोण पोचवते?


**प्र. २. तुम्ही पाहिलेल्या आगगाडीचे चित्र काढा. रंगवा.**


**प्र. ३. आगगाडी प्रवासाचा तुमचा अनुभव सांगा.**

**प्र. ४. वेगवेगळ्या वाहनांसंबंधी कविता गोळा करा. संग्रह करा.**

9N6GGJ








# २०. मुलांनी काढलेली चित्रे – २


• पाहा व बोला.















**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला व चित्रांसंबंधी प्रश्न विचारायला सांगावे. प्रत्येक चित्रासंबंधी प्रश्न विचारावे. विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे फळ्यावर लिहावी. आवडीची चित्रे काढण्यास सांगावे. त्या चित्रांचे प्रदर्शन भरवावे.

# २१. बसस्थानक




- पाहा, सांगा व वाचा.
- खालील चित्र पाहा. शब्दांचे अर्थ माहीत करून घ्या. या शब्दांच्या साहाय्याने तुमच्या शब्दांत तुमचे अनुभव सांगा.




- **उपक्रम :** शिक्षक किंवा पालकांसोबत बसस्थानक पाहा. चित्रात दाखवल्याप्रमाणे तिथे काय काय दिसते, वेगळे काय दिसते, ते लक्षात ठेवा. वर्गात सांगा.

**शिक्षकांसाठी :** चित्रातील शब्दांचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून शब्द वाचून घ्यावे. बसस्थानकाप्रमाणे बाजार, रेल्वेस्थानक, दवाखाना, शाळा, विमानतळ, संगणक कक्ष असे विषय देऊन त्यांच्याशी संबंधित शब्द विद्यार्थ्यांना विचारावे. ते शब्द फळ्यावर लिहावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. वरील स्थळांना भेटी द्यायला सांगावे. विद्यार्थ्यांना भेटीदरम्यानचे त्यांचे अनुभव विचारावे. त्या अनुभवांचे अनुभव-तक्ते तयार करून वाचून घ्यावे.

# २२. स्वच्छ घर – स्वच्छ परिसर

• **पाहा व बोला.**




**वाचा.**

कचरा या समस्येने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे समुद्रात राहणाऱ्या जीवांना धोका निर्माण झाला आहे. आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी प्लॅस्टिकचा वापर टाळणे गरजेचे आहे. बाजारात जाताना कागदी किंवा कापडी पिशव्या सोबत न्याव्या. यामुळे प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर आपण टाळू शकतो.

• **उपक्रम :**


१. प्लॅस्टिकचा वापर आपण कसा टाळू शकतो यावर गटात चर्चा करा. गटाचे मत वर्गात सांगा.

२. कचऱ्याच्या समस्येविषयी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या, चित्रे यांचा संग्रह करा. वर्गात दाखवा. त्यावर चर्चा करा.

# २३. माझा अनुभव – २

9P7ZN5

• ऐका व वाचा.



शाळा सुटली. मी घरी आलो. इकडे तिकडे पाहिले तर आई झोपलेली दिसली. या वेळी ती अशी कधीच झोपत नाही. मी आईजवळ गेलो. ''आई, तुला बरं वाटत नाही का?'' असे विचारत मी तिच्या शेजारी बसलो. आईच्या अंगाला हात लावून पाहिला. आईला खूप ताप आला होता. तिचे अंग तापाने फणफणत होते.

मी लगेच थंड पाणी घेतले. स्वच्छ रुमाल घेतला. तो थंड पाण्यात बुडवला. मी आईच्या कपाळावर रुमालाच्या घड्या ठेवू लागलो. काही वेळाने आईचा ताप थोडासा कमी झाला. मी डॉक्टरांकडे गेलो. त्यांना घरी घेऊन आलो. डॉक्टरांनी आईला तपासले. औषधे लिहून दिली. मी आईला चहा करून दिला. थोड्या वेळाने आईला झोप लागली. मी घर आवरले. घर स्वच्छ झाडून घेतले.

तेवढ्यात बाबा आले. त्यांनी डॉक्टरांनी दिलेली औषधे आणली. आईला दिली. आता आईला थोडे बरे वाटू लागले. आई उठून बसली. बाबा म्हणाले, ''तू उठू नकोस. आराम कर. जेवणाचं मी बघतो.'' आईच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. आईचा आनंदी चेहरा पाहून आम्हांलाही आनंद झाला.

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी अनुभव-कथनाचे प्रकट वाचन करावे. वाचताना विद्यार्थ्यांना प्रत्येक ओळीवर लक्ष ठेवण्यास सांगावे. जोडाक्षरयुक्त शब्द फळ्यावर लिहावे. त्या शब्दांचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून त्या शब्दांचे वाचन करून घ्यावे. अनुभव-कथनाचे वाचन घ्यावे. वाचनाचा सराव द्यावा. विद्यार्थ्यांना स्वतःचे अनुभव कथन करण्यास सांगावे. त्यांनी सांगितलेल्या अनुभवांचे तक्ते तयार करावे. ते गटागटांत वाचून घ्यावे. वरील प्रसंगाचे वर्गात सादरीकरण घ्यावे.

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) तापाने फणफणणारी –

(आ) आईच्या कपाळावर रुमालाच्या घड्या ठेवणारा –

(इ) औषधे आणणारे –

(ई) आईला तपासणारे –

**प्र. २. तुम्ही घरी कोणकोणत्या कामांत मदत करता, यावर गटात चर्चा करा.**

**प्र. ३. खालील शब्द वाचा.**

| एक | अनेक |
|---|---|
| घडी | घड्या |
| औषध | औषधे |
| चेहरा | चेहरे |

| एक | अनेक |
|---|---|
| रुमाल | रुमाल |
| चहा | चहा |
| शाळा | शाळा |

| एक | अनेक |
|---|---|
| घर | घरे |
| शेजारी | शेजारी |
| मी | आम्ही |

- **पाहा. ऐका. समजून घ्या. म्हणा व वाचा.**

| | | |
|---|---|---|
| म्हणत | म्ह | म् + ह |
| तिच्या | च्या | च् + य + ा |
| स्वच्छ | स्व<br>च्छ | स् + व<br>च् + छ |
| घड्या | ड्या | ड् + य + ा |
| डॉक्टरांकडे | क्ट | क् + ट |
| त्यांना | त्यां | त् + य + ां |
| तेवढ्यात | ढ्या | ढ् + य + ा |
| चेहऱ्यावर | ऱ्या | ऱ्(र्) + य + ा |

- **थोडा – थोडासा, यासारखे खालील शब्द लिहा.**

(अ) लहान (आ) छान (इ) काही

(ई) नाही (उ) बारीक (ऊ) अल्प

# २४. ईद

- **ऐका व वाचा.**

जॉन, सुरभी, अजय सगळे खेळत होते. इतक्यात शेजारचा उस्मान आला. त्याने आज नवीन कपडे घातले होते. तो जवळ येताच अजयने विचारले, ''अरे उस्मान, आज नवीन कपडे, आज काय वाढदिवस आहे का तुझा?''

**उस्मान** : नाही. आज रमजान ईद आहे. अम्मीने तुम्हां सर्वांना लगेच घरी बोलावलंय.

**अजय** : कशाला?

**उस्मान** : अरे शीरखुर्मा खायला. चला सगळेच जाऊया.

(सगळे मिळून उस्मानच्या घरी जातात.)

**अम्मी** : या, या मुलांनो! बसा. आज ईदचा दिवस. आमच्याकडे आज शीरखुर्मा असतो. सगळ्यांनी पोटभर खा.

**सुरभी** : अम्मी, शीरखुर्मा म्हणजे काय?

**अम्मी** : शीरखुर्मा म्हणजे शेवयांची खीर. त्यामध्ये दूध, साखर, मनुके, काजू, खारीक, बदाम इत्यादी पदार्थ असतात.

(हे सांगता सांगता अम्मीने सर्वांना शीरखुर्मा दिला. मुले आनंदाने खाऊ लागली.)

**जॉन** : खरंच अम्मी, शीरखुर्मा खूपच छान झालाय.

**सर्वजण** : अच्छा. येतो आम्ही.

**अम्मी** : परत या बरं का ! पुढच्या ईदलापण या, शीरखुर्मा खायला.



**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) उस्मानच्या घरी कोण कोण गेले ?

(आ) उस्मानच्या घरी कोणता सण होता ?


(ई) उस्मानच्या आईने सगळ्यांना घरी का बोलावले होते?

**प्र. २. कोण म्हणाले, ते लिहा.**

(अ) नाही. आज रमजान ईद आहे.

(आ) खरंच अम्मी, शीरखुर्मा खूपच छान झालाय.

**प्र. ३. तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे करतात, कसे साजरे केले जातात, या सणांना कोणते विशिष्ट पदार्थ तयार करतात, याबद्दल गटागटांत माहिती सांगा.**





**वाचा.**

**पिंकी** : हिरव्या भाज्या खाल्ल्या तर चश्मा लागत नाही.

**रिंकी** : कशावरून ?

**पिंकी** : अगं, बघ ना ! गवत खाणाऱ्या कुठल्याच प्राण्याला चश्मा लागत नाही.

• चित्रांवरून सणांची नावे सांगा.



• आपले राष्ट्रीय सण कोणते ? त्यांची नावे सांगा.

# २५. संगणक

* **ऐका व म्हणा.**




घरीच माझ्या
संगणक आणणार,
अचूक गणित
त्यावर करणार.

सुबक सुंदर
काढणार चित्र,
देश-विदेशांत
जोडणार मित्र.

संगणकाद्‌वारे आता
संवाद साधणार,
दूरच्या व्यक्तीचा
चेहरा बघणार.

घरीच बसून
जग बघणार.
व्यवहार सारे
झटपट करणार.

**- बबन शिंदे**

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. गाण्याची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना स्वतःबरोबर कविता म्हणायला सांगावी. वर्गाबरोबर, गटांत व वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी. संगणकावर कोणकोणती कामे करता येतात याची माहिती प्रात्यक्षिकाद्‌वारे द्यावी.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीच्या घरी काय आणणार आहेत ?

(आ) कवी कुठले मित्र जोडणार आहे ?

(इ) तुम्ही संगणकावर काय काय करता ?

**प्र. २. शेवटचे अक्षर समान असणारे कवितेतील शब्द लिहा.**

उदा., आणणार–करणार.


**प्र. ३. खालील शब्द लिहा. असे आणखी शब्द शोधा व लिहा.**

चित्र, मित्र, रात्र, पत्र, सत्र.

झटपट, पटपट, खटपट, कटकट.

चेहरा, मोहरा, पहारा, सहारा.

**प्र. ४. नवीन शब्द बनवा व लिहा.**




उदा., अबोल.

__________

__________

__________

__________

__________

9PQRRF




**वाचा.**

**एक प्रवासी** : तुमच्या गावात कोणी मोठा माणूस जन्मला आहे काय ?

**मुलगा** : नाही. आमच्या गावात सारी लहान मुलेच जन्मतात. मग ती मोठी होतात.

# २६. आमचे चुकले

• ऐका व वाचा.




एकदा सानेगुरुजी रेल्वेने प्रवास करत होते. त्यांच्या शेजारचे प्रवासी शेंगा, संत्री खात होते. टरफले, साली खाली टाकत होते. त्यांचे खाऊन झाल्यावर गुरुजी उठले. टरफले, साली गोळा केल्या. कागदात बांधून ठेवल्या. गुरुजी आपल्या जागेवर बसले. शेंगा खाणाऱ्या प्रवाशांना खंत वाटली नाही. नंतर पुढच्या स्टेशनवर एक प्रवासी त्या डब्यात चढला. सानेगुरुजींना पाहताच त्याने वाकून नमस्कार केला, तेव्हा शेजारची प्रवासी मंडळी चमकली. त्यांनी चौकशी केली. चौकशी करताच ते सानेगुरुजी आहेत, हे त्यांना कळले. ते सर्वच खजील झाले व म्हणाले, ''गुरुजी, आमचे चुकले. क्षमा करा.''

गुरुजी नम्रपणे म्हणाले, ''मी कोण तुम्हांला क्षमा करणार ? गाडीमध्ये आपण सर्वजण बसतो, प्रवास करतो. गाडी स्वच्छ ठेवणं ही सर्वांचीच जबाबदारी आहे. गाडी घाण होऊ नये, म्हणून मी ती स्वच्छ केली.''

अशी ही गुरुजींची वृत्ती ! आपल्या जीवनात कोणतेही काम त्यांनी कधीच हलके मानले नाही.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रवासी काय खात होते?

(आ) प्रवाशांचे खाणे झाल्यानंतर गुरुजींनी काय केले?

(इ) सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवण्याबाबत आपली कोणती जबाबदारी आहे?

**प्र. २. तर काय झाले असते ?**

(अ) सानेगुरुजी रेल्वेच्या डब्यात नसते.

(आ) टरफले टाकणाऱ्या प्रवाशांनी सानेगुरुजींना ओळखले नसते.

**प्र. ३. सार्वजनिक ठिकाणी कचरा करणारे लोक पाहिल्यास तुम्ही त्यांना काय सांगाल ?**

**प्र. ४. आपला वर्ग व शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही काय काय कराल ?**

- **उपक्रम :**

१. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी शहरात काही घोषवाक्ये लिहितात. अशा घोषवाक्यांचा संग्रह करा.

२. 'संत गाडगेबाबा' यांनी ग्रामस्वच्छतेविषयी केलेल्या कामांची माहिती मिळवा.





**वाचा.**

**आई** : अरे बंडू, डोळे मिटून आरशापुढे का उभा आहेस ?

**मुलगा** : अगं आई, मी झोपलो म्हणजे कसा दिसतो, ते पाहत होतो.

# २७. धाडसी झुगी

• ऐका व वाचा.



झुगी नऊ-दहा वर्षांची मुलगी. ती आणि तिचे आईबाबा शेतातील झोपडीत राहत. तिचे आईबाबा शेतात काम करत.

सायंकाळ झाली. झुगी अभ्यास करत बसली होती. झोपडीबाहेर कोकरू बांधले होते. झोपडीत येऊन आईने चुलीवर भात शिजायला ठेवला. झुगीला भाताकडे लक्ष ठेवायला सांगितले आणि विहिरीवर पाणी आणायला गेली. तेवढ्यात कोकराचा बँऽऽ बँऽऽ ओरडण्याचा आवाज आला. तशी झुगी धावतच झोपडीबाहेर आली. तिला एक लांडगा दिसला. तो कोकराकडे येत होता. झुगी घाबरली. क्षणभर विचार केला. ती झटकन झोपडीत गेली. चुलीतील जळते लाकूड घेऊन बाहेर आली. लांडगा कोकरावर झडप घालणार इतक्यात झुगीने जळते लाकूड लांडग्याच्या दिशेने फेकले. आगीला पाहून लांडगा घाबरला. तो पळाला. कोकराचा जीव वाचला. 'पळाऽ पळा, लांडगाऽ पळाऽ', झुगी जोरजोरात ओरडू लागली.

तिच्या आवाजाने शेतात काम करणारे बाबा धावत आले. आईही आली. झुगीने त्यांना घडलेला प्रसंग सांगितला. आईने तिला जवळ घेतले. बाबांनी तिच्या डोक्यावरून हात फिरवला.

झुगीच्या धाडसाची बातमी गावात पसरली. गावच्या सरपंचांनी तिची पाठ थोपटली. शाळेतील शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी तिच्या धाडसाचे कौतुक केले.

**शिक्षकांसाठी :** पाठाचे प्रकट वाचन करावे. योग्य हावभावांसह गोष्ट सांगावी. फळ्यावर जोडाक्षरांचे लेखन करावे. जोडाक्षरे वाचून घ्यावी. विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे.

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) या पाठातील पात्रे कोणती ?

(आ) झुगी कोठे राहत होती ?

(इ) झुगीला कशाचा आवाज आला ?

(ई) लांडगा कोणावर झडप घालणार होता ?

(उ) झुगीच्या धाडसाचे कौतुक कोणी कोणी केले ?

(ऊ) झुगीमध्ये असलेले गुण सांगा.

**प्र. २. का ते सांगा.**

(अ) झुगी धावत झोपडीबाहेर आली.

(आ) झुगीने जळते लाकूड हातात घेतले.

(इ) लांडगा घाबरला.


(ई) झुगी जोरजोरात ओरडू लागली.

(उ) गावच्या सरपंचांनी झुगीची पाठ थोपटली.

**प्र. ३. कोकरू बँऽऽ बँऽऽ ओरडते. तसे खालील प्राणी जसे ओरडतात तसे आवाज काढून दाखवा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) कोंबडा | (इ) बदक | (उ) कावळा | (ए) वाघ |
| (आ) मांजर | (ई) चिमणी | (ऊ) मोर | |

- **चित्रे बघून कोडे पूर्ण करा.**




- **वर्तमानपत्रांतील कोड्यांचा संग्रह करा. मधल्या सुट्टीत गटागटांत सोडवा.**


# २८. प्रश्न

- **ऐका व वाचा.**

पशुपक्ष्यांना असते अवगत
जगण्याची ही कला,
माणसाला का जमत नाही ?
प्रश्न पडतो मला.




चिमणी कधी म्हणत नाही
हवा मोरासारखा पिसारा,
गाय काळजी करत नाही
मिळेल का मला चारा ?



कोकीळ कधी म्हणत नाही
काळा का माझा रंग ?
तो तर आनंदाने
गाण्यात असतो दंग !



बैल कधी म्हणत नाही
मीच का राबू ?
कावळा कधी विचारतो का
वापरू कोणता साबू ?



ससा कधी म्हणत नाही
मीच का भित्रा ?
वाघोबाचा शूरपणा
मागत नाही कुत्रा.



जो तो जगतो आनंदाने
नाही कसली चिंता,
माणसाच्याच मनात असतो
विचारांचा गुंता.



**– प्रभा मुळे**

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) पशुपक्ष्यांना कोणती कला अवगत असते ?

(आ) पशुपक्ष्यांप्रमाणे माणसे आनंदाने का जगत नाहीत?

**प्र. २. खालील पशुपक्ष्यांना कोणते प्रश्न पडत नाहीत ?**

(अ) गाय (इ) बैल (उ) ससा

(आ) कोकीळ (ई) कावळा

**प्र. ३. कोण ते सांगा.**

(अ) पिसारा असणारा -

(आ) गाण्यात दंग -

(इ) खूप भित्रा -

(ई) शूरपणासाठी प्रसिद्ध -

(उ) मनात विचारांचा गुंता असणारा -

**प्र. ४. असे घडले तर काय होईल, ते सांगा.**

(अ) चिमणीला मोरासारखा पिसारा मिळाला, तर...

(आ) बैलाने कष्ट करायला नाही म्हटले, तर...

(इ) सशामध्ये शूरपणा आला, तर...

**प्र. ५. शेवटची अक्षरे जुळणारे शब्द लिहा.**

**उदा.,** कला - मला.

**प्र. ६. कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

(अ) चिमणी ..................

.................. पिसारा.

(आ) वाघोबाचा ..................

.................. कुत्रा.

(इ) जो तो ..................

.................. चिंता.

**प्र. ७. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा.**


(अ) कावळा (आ) मोरासारखा (इ) विचारतो

# २९. मी सगळ्या भाज्या खाणार !

• चित्रे पाहा. वाचा.

आईने तेजसला ताट वाढले. ताटात कारल्याची भाजी. कडू कारले त्याला आवडत नसे.

''आई, मला ही भाजी नको.'' तेजस म्हणाला. तसाच तो ताटावरून उठला. आई तेजसवर खूप रागावली. आईच्या बोलण्याचा तेजसलाही राग आला. तो उपाशीच झोपला.





झोपेत त्याला स्वप्न पडले. स्वप्नात तो मंडईत गेला. मंडईत भाजीची दुकाने सजलेली. सगळीकडे भाज्याच भाज्या.

'बापरे ! किती ह्या भाज्या !' तेजस मनातल्या मनात म्हणाला.

तेवढ्यात तेजसच्या समोर बटाटा आला आणि त्याला म्हणाला,


''भाजून खा. उकडून खा. तळून खा. वजन वाढवायचे तर मलाच खा.''


पळत पळत टमाटा आला. तेजसकडे पाहून हसला अन् म्हणाला,

'' मला जर तुम्ही खाल,  
तर होतील गाल लालेलाल.  
कोशिंबीर तुम्ही खाणार,  
तर जेवण रुचकर लागणार.  
सूप आणि सॉस,  
तुमच्यासाठी आहेत खास.''



मुळा आणि गाजर तोऱ्यात म्हणाले,
'' आम्हांला रोज खाणार,
त्याचे डोळे सुंदर राहणार.
डोळ्यांना ताकद मिळणार.
चश्मा लवकर नाही लागणार.''
काकडी आली उड्या मारत आणि म्हणाली,
'' मी असते थंडगार,
मला खाण्यात मजा फार.
तुम्हांला व्हायचे सशक्त,
तर मलाच खा फक्त.''





तिकडून आली मेथी. तिच्यासोबत होते चुका, चाकवत, माठ आणि पालक. एकमेकांचा हात धरून ते गाऊ लागले.
'' हिरव्या हिरव्या पालेभाज्या,
रोज खाव्या ताज्या ताज्या.
आमच्यातून मिळवा पोषक घटक,
खाण्याची लागेल तुम्हांला चटक.''

तेवढ्यात आले कारले. हिरव्या हिरव्या रंगाचे, खडबडीत अंगाचे. ते म्हणाले,
'' माझ्याकडे पाहून नका हसू,
चुकूनही कधी नका रुसू.
माझ्यात आहेत खूप गुण,
घ्यावेत तुम्ही ते जाणून.
मी आहे खूप औषधी,
आजारपण येणार नाही कधी.''



तेजस लक्ष देऊन ऐकत होता, सगळ्यांनाच काहीतरी सांगायचे होते. त्यात भेंडी, गवार, वांगी होती. पडवळ आणि कोबी होती. फ्लॉवर होता. मिरचीपण होती. सगळ्यांनी एकच घाई केली.

त्यांच्या गलक्याने तेजसला जाग आली.

तो पळतच आईकडे गेला. आईला म्हणाला, ''आई, आजपासून मी सगळ्या भाज्या खाणार. मला सर्व भाज्या आवडतात.''

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) तेजसला कोणती भाजी आवडत नव्हती?

(आ) मंडईत कशाची दुकाने सजलेली होती?

(इ) काय खाल्ल्यावर गाल लाल होतात?

(ई) मुलांसाठी टमाट्याचे खास काय बनवले जाते?

(उ) डोळ्यांना ताकद कशामुळे मिळते?

(ऊ) आपल्याला पोषक घटक कशाकशांतून मिळतात?

### प्र. २. कोण म्हणाले, ते लिहा.

(अ) आई, मला ही भाजी नको.

(आ) कोशिंबीर तुम्ही खाणार, तर जेवण रुचकर लागणार.

(इ) चश्मा लवकर नाही लागणार.

(ई) हिरव्या हिरव्या पालेभाज्या, रोज खाव्या ताज्या ताज्या.

(उ) आजारपण येणार नाही कधी.


### प्र. ३. शेवटचे अक्षर सारखे असणारे पाठातील शब्द लिहा.

**उदा.,** बटाटा–टमाटा.

A2M5BA



# ३०. खुर्ची आणि स्टूल



- **ऐका व वाचा.**

खुर्ची म्हणाली,
''अरे स्टुला,
केव्हा येणार
चालायला तुला?''

स्टूल म्हणाले,
''त्याच वेळी
जेव्हा हाताने
वाजवशील टाळी !''

– हे ऐकून
पंखा हसला,
पाय नसून
फिरत बसला.

**– विंदा करंदीकर**

**प्र. १. कोण, कोणास म्हणाले ते लिहा.**

(अ) ''केव्हा येणार चालायला तुला?''

(आ) ''जेव्हा हाताने वाजवशील टाळी!''

**प्र. २. या कवितेत खुर्ची आणि स्टूल यांच्यातील संवाद दिला आहे. तुम्ही कोणत्याही दोन वस्तूंमधील संवाद तयार करा. वर्गात सादर करा.**

**प्र. ३. खालील शब्द सारणीत योग्य ठिकाणी लिहा.**

फूल, फळा, खिडकी, दरवाजा, झाड, वही.

| | तो | ती | ते |
|---|---|---|---|
| उदा., | पंखा | खुर्ची | स्टूल |
| | | | |
| | | | |

# ३१. आपलं वाचनालय

A36JEK

• ऐका. म्हणा. वाचा.



**अतुल** : ए सुहास ! चल ना रे खेळायला.

**सुहास** : थांब ना रे जरा. ह्या पेपरमध्ये किती छान माहिती छापून आली आहे. ह्या माहितीचं कात्रण कापून घेतो. मग जाऊया ना खेळायला.

**अतुल** : तू एवढ्या कात्रणांचं करतोस तरी काय ?

**सुहास** : अरे, वर्तमानपत्रांत छान छान कविता, चित्रकथा, गोष्टी, कोडी, पशुपक्ष्यांची माहिती येते. ती मी कापून वहीत चिकटवतो. मॅडमनं सांगितलेला प्रकल्प पूर्ण होतो.


**अतुल** : अरे वा ! छानच.

**सुहास** : अरे एवढंच नाही. काही वेळा रद्दीमध्ये कवितांची, गोष्टींची चांगली पुस्तकं येतात. ती मी बाजूला काढून ठेवतो.

**अतुल** : त्या पुस्तकांचं तू काय करतोस?

**सुहास** : त्यांचं मी एक वाचनालय तयार केलं आहे. चल माझ्या घरी. मी तुला दाखवतो.
(ते दोघे सुहासच्या घरी येतात. त्याचवेळी मीनाही तिथे येते.)

**सुहास** : ये मीना.



**मीना** : सुहास, ही पुस्तकं तुझ्या वाचनालयासाठी घे. ही सगळी पुस्तकं माझ्या वडिलांनी आणली होती. आम्ही ती पुस्तकं वाचली. ती रद्दीत देण्याऐवजी तुझ्या वाचनालयासाठी मी घेऊन आले.

**अतुल** : हे छान झालं. मी सुद्धा तुला चांगली पुस्तकं देईन.

**सुहास** : मीना, अतुल मी तुमचा आभारी आहे. हे वाचनालय केवळ माझं नाही, तर सगळ्यांसाठी आहे. थेंबे थेंबे तळे साचे, तसं एक-एक पुस्तक गोळा करून हे वाचनालय तयार झालं आहे; म्हणून मी ह्या वाचनालयाचं नाव ठेवलं-'आपलं वाचनालय.'

**अतुल** : छान आहे नाव !

**सुहास** : चला तर ! आता आपण सगळे रविवारी भेटूया. वाचूया. खेळूया. अभ्यासही करूया.

(सारेजण हसतात.)


### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अतुल सुहासला कशासाठी बोलवत होता?
२. वर्तमानपत्रांत कशाकशाची माहिती येते?
३. सुहास रद्दीतील कोणती पुस्तके बाजूला काढतो?
४. सर्वजण रविवारी भेटून काय काय करणार आहेत?


### प्र. २. सांगा.

१. सुहास कात्रणांचे काय करतो?
२. सुहास रद्दीतील पुस्तकांचे काय करतो?
३. सुहासने वाचनालयाला 'आपलं वाचनालय' हे नाव का दिले ?

• पाहा. वाचा. वाक्ये बनवा.






* आई, बाबा, ताई माझे खूप लाड करतात.
* आजोबा माझा अभ्यास घेतात.
* आमचे फळांचे दुकान आहे.
* आई दुकानाच्या कामात बाबांना मदत करते.
* बाबा आईला स्वयंपाकात मदत करतात.
* आजी छान छान गोष्टी सांगते.
* सणाच्या दिवशी काकाकाकी येतात.


































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

अमराठी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी सुलभभारती इ. ४ थी

₹ २४.००